**जाक्र/उमाशि-२/शिमा/पुवि/२०१२**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे १. यांचे कार्यालय,**
**दि :- ७/८/२०१२**

**प्रति,**

**प्राचार्य/प्राचार्या,**
**माध्यमिक विद्यालय संलग्न उच्च माध्यमिक विद्यालये**
**वरिष्ठ महाविद्यालयांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये**
**पुणे / सोलापूर / अहमदनगर**

**विषय - अ) शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता.**
**ब) तक्ता अ मधील कायम शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मान्यता कार्यभारानुसार पुढे चालू ठेवणे.**
**क) तक्ता ब मधील मान्यता प्राप्त असलेले पूर्ण वेळ शिक्षक ज्यांचा परिविक्षाधीन कालावधी चालू आहे. तसेच पूर्ण वेळ शिक्षण सेवक ज्यांचा शिक्षण सेवक कालावधी चालू आहे त्यांच्या मान्यता कार्यभारानुसार पुढे चालू ठेवणे.**

वरील विषयास अनुसरुन शैक्षणिक वर्ष स-न २०१०-११ या पासून पुणे विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील उच्च माध्यमिक विभागाची संच मान्यता या विभागाची (वेबसाईट) संकेत स्थळ www.dydepune.com नुसार आपण सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने भरण्यात येत आहे. या शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्येही संच मान्यते संबंधिची माहिती ऑनलाईन पध्दतीने वेबसाईटवरील संचमान्यतेचे सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने आपल्या तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने भरावयाची आहे. त्यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. त्याबाबतच्या आवश्यक त्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१. आपल्या जिल्हयातील तालुक्याचे अथवा अन्य सोईच्या ठिकाणी संच मान्यतेची माहिती वेबसाईटवर भरण्यासाठी एक केंद्र निश्चित केलेले आहे. या परिपत्रकासोबत तक्ता जोडला आहे.

माहिती भरण्यासाठी प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तिकडून माहिती भरण्यासाठी आपण त्यांची मदत घ्यावी. त्यांची नावे व संपर्क क्रमांक या माहितीचा तक्ता सोबत जोडला आहे.

२. सदर केंद्रावर दिनांक ९/८/२०१२ ते दिनांक १६/८/२०१२ या कालावधीत स. १०.३० ते सायं ५.३० या वेळेत संपर्क साधून आपणास आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती वेबसाईटवर भरता येईल. त्यानंतर वेबसाईटवर सॉफ्टवेअर उपलब्ध होणार नाही. दिलेल्या कालावधीत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची सर्व माहिती भरुन घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. विहित मुदतीत माहिती भरली गेली नाही तर आपल्या क.म.वि. ची या वर्षीची संच मान्यता न होण्याची शक्यता आहे. त्यानंतर कोणतेही कारण ऐकून घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३. वेबसाईटवर माहिती भरण्यासाठी जाताना आपण आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित खालील कागदपत्रे सोबत घेवून वेळापत्रकानुसार निश्चित केलेल्या केंद्रावर जावयाचे आहे.

अ) शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील संच मान्यता प्रत, शिक्षक मान्यता प्रत (पुरवणी मान्यतेसह)

ब) शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये इ. ११ वी व इ. १२ वी या वर्गात दिलेल्या प्रवेशा-नुसार शाखा व तुकडया निहाय विद्यार्थी संख्या (त्या विद्यार्थ्यांच्या नोंदी जनरल रजिस्टर मध्ये असाव्यात) जनरल रजिस्टरमध्ये नोंदी केलेल्या विद्यार्थ्यांचे इयत्ता १० वी तील शाळा सोडल्याचे दाखले.

क) शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी तक्ता **अ**, तक्ता **ब**, तक्ता क मधील शिक्षक मान्यता बाबतची प्रपत्रे विहित नमुन्यात भरावीत.

४. उपरोक्त माहिती वेबसाईटवर तज्ञ प्रशिक्षकांमार्फत भरताना खालील बाबींची कृपया काळजी घ्यावी.

अ) माहिती वेळेत बिनचूक भरावयाची आहे. भरलेल्या माहितीची पूर्ण तपासणी व खात्री करावी. एकदा भरलेली माहिती ही अंतिम असणार आहे. त्यामध्ये एंटर बटन दाबल्यावर आपणास कोणताही बदल करण्याचा अधिकार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

ब ) तक्ता **अ** मध्ये माहिती भरताना जर एखादे पद सेवानिवृत्ती, मृत्यु, राजीनामा इ. कारणांमुळे रिक्त झाले असेल तर त्यासंबंधी माहिती भरताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. सदर शिक्षकाच्या रिक्त झालेल्या पदावर संस्थेतील अन्य क.म.विद्यालयातील (तक्ता **अ** मध्ये असलेल्या) शिक्षकाच्या बदलीने सदर पद भरले असेल तर त्या शिक्षकाची माहिती भरणे आवश्यक आहे. सोबत बदली आदेशाची प्रत जोडावी.

**२. सदर पदावर नवीन नियुक्ती असेल तर त्याबाबतची माहिती तक्ता 'क' मध्ये भरावी.**

३. जर सेवानिवृत्तीची तारीख १ जून ते ३१ डिसेंबर २०१२ असेल तर त्यांचे नाव व सेवानिवृत्तीचा दिनांक नमूद करुन तक्ता **अ** मध्ये समाविष्ठ राहील.

४. जर सेवानिवृत्तीची तारीख १ जानेवारी ते ३१ मे २०१२ अशी असेल तर त्यांचे नाव तक्ता **अ** मध्ये समाविष्ट करु नये.

क) शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये तक्ता ब मधील पूर्णवेळ शिक्षक / शिक्षण सेवक यांना मान्यता आहे व ज्यांचा परिविक्षाधीन कालावधी चालू आहे. अशा शिक्षक/शिक्षण सेवकांची नोंद तक्ता **ब** मध्येच घ्यावी.

ड) तक्ता ब मधील पूर्णवेळ शिक्षक/शिक्षण सेवक यांचा परिविक्षाधिन कालावधी / शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाला असेल अशा शिक्षकांची नोंद तक्ता अ मध्ये घ्यावी. तथापि तक्ता अ मधील मान्यतेबाबतची संपूर्ण कागदपत्रे पटपडताळणी प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

ई) शैक्षणिक वर्ष २०११ - १२ मध्ये मान्यता प्राप्त असलेले अर्धवेळ / प्र. घ. ता. शिक्षक यांची माहिती तक्ता क मध्ये भरण्यात यावी तसेच शेक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये मान्यता प्राप्त असलेले माध्यमिक शिक्षक उच्च माध्यमिकचा कार्यभार घेत होते त्यांचा कार्यभार फक्त अध्यापनासाठी मान्य केला जाईल, त्यांची नावे तक्ता क मध्ये घ्यावीत. सेवानिवृत्ती, मृत्यु, राजीनामा इ. कारणामुळे रिक्त झालेल्या पदावर शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये पूर्ण वेळ शिक्षक / शिक्षण सेवक यांची नियुक्ती केली असेल तर त्यांची नावे तक्ता क मध्ये समाविष्ठ करावीत. तथापि नवीन पूर्णवेळ शिक्षक / शिक्षण सेवक नियुक्ती मान्यता प्रस्ताव वैयक्तिक मान्यता शिबीरात सादर करावेत. (उपरोक्त नमूद केलेल्या अ मधील अ.क्र. २ नुसार)

ई) शैक्षणिक वर्षे २०१२-१३ मध्ये आपल्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विषयासाठी विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे अथवा एखाद्या शाखेला विद्यार्थी संख्या कार्यभार गणना करण्याइतपत उपलब्ध न झाल्याने मान्य शिक्षकांचा कार्यभार १३.३० किंवा त्यापेक्षा कमी होत असेल तर अशा शिक्षकास / अतिरिक्त घोषित करुन त्याबाबतची माहिती त्वरीत या कार्यालयास सादर करावी. अन्यथा सदर शिक्षकास अदा केलेल्या जादा वेतनास संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील.

**वेबसाईटवर माहिती भरल्यानंतर संच मान्यतेची माहिती तपासणीसाठी घेण्यात येणाऱ्या शिबिरा बाबतची माहिती या कार्यालयाच्या www.dydepune.com वर प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यासाठी वेळेची बचत व प्रशासकीय कामात गतिमानता, अचूकता तसेच आधुनिक युगात संगणक प्रणालीचा वापर यासाठी कार्यालयाची वेबसाईट नियमित पहावी. यापुढे कोणत्याही प्रकारची परिपत्रके पोस्टाने पाठवली जाणार नाहीत ती वेबसाईटवरच दिली जातील. तिथून ती Download करुन घ्यावीत.**

या परिपत्रकासोबत संच मान्यतेसंबंधी वेबसाईटवर माहिती भरण्यासाठी नमूद केलेले वेळापत्रक व इतर माहिती सोबत जोडली आहे.

स्वाक्षरी/-
**(भिमराव फडतरे)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे**

**प्रत माहितीसाठी-:**

**१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.**

**२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १.) यांना माहितीस्तव सविनय सादर.**